
# Bank Visit 16/03/2026
## (J.P.PARSIK CO-OPERATIVE BANK, ICHALKARANJI)



HOD Dr. Ashok H. Bogulwar, while giving an introduction and explaining the importance of Banking




Nandani Bhamre Guidance students on new systems and management in the banking sector




Students and teachers present for the bank visit

# जनमत सर्वसामान्यांचे



## जे.पी.पारसिक सहकारी बँकेच्या व्यवहारातून अर्थशास्त्राचे धडे; विद्यार्थ्यांचा अनोखा अनुभव

कोल्हापूर, दि.१६ (प्रतिनिधी)– दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी येथील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत इचलकरंजी येथील जे.पी पारसिक सहकारी बँक इचलकरंजी, शाहू पुतळा येथे विद्यार्थ्यांनी भेट देऊन बँकेच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. या भेटीदरम्यान बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना बँकेची रचना, ठेवी,कर्ज व्यवहार, डिजिटल बँकिंग सेवा, ग्राहक सेवा तसेच सहकारी बँकांचे स्थानिक अर्थव्यवस्थेतील महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून बँकिंग व्यवस्थेबाबत माहिती अवगत करून घेतली.या क्षेत्रीय भेटीमुळे विद्यार्थ्यांना अर्थशास्त्रातील सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच बँकिंग क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळाली. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य (डॉ) एस. के. खाडे यांचे मार्गदर्शन लाभले. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ .ए.एच. बोगुलवार यांनी प्रास्ताविक केले . तसेच कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागातील डॉ.वर्षा शिंदे प्रा.एस.एस. पाटील, प्रा. बाजीराव वारंग सह अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. बँकेचे व्यवस्थापक श्रीकांत पाटील,पद्मश्री पाटील,अमित घाडगे, नंदिनी भामरे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले.प्रा.डॉ.राजकुमार गित्ते यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले .

# दैनिक रोखठोक (१७/०३/२०२६)

## जे.पी.पारसिक सहकारी बँकेच्या व्यवहारातून अर्थशास्त्राचे धडे : विद्यार्थ्यांचा अनोखा अनुभव

■ दैनिक रोखठोक

**कोल्हापूर / प्रतिनिधी**

दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी येथील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत इचलकरंजी येथील जे.पी पारसिक सहकारी बँक इचलकरंजी, शाहू पुतळा येथे विद्यार्थ्यांनी भेट देऊन बँकेच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली.

या भेटीदरम्यान बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना बँकेची रचना, ठेवी,कर्ज व्यवहार, डिजिटल बँकिंग सेवा, ग्राहक सेवा तसेच सहकारी बँकांचे स्थानिक अर्थव्यवस्थेतील महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून बँकिंग व्यवस्थेबाबत माहिती अवगत करून घेतली.या क्षेत्रीय भेटीमुळे विद्यार्थ्यांना अर्थशास्त्रातील सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच बँकिंग क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य (डॉ) एस. के. खाडे यांचे मार्गदर्शन लाभले. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ .ए.एच. बोगुलवार यांनी प्रास्ताविक केले . तसेच कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागातील डॉ. वर्षा शिंदे प्रा.एस.एस. पाटील, प्रा. बाजीराव वारंग सह अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. बँकेचे व्यवस्थापक श्रीकांत पाटील,पद्मश्री पाटील,अमित घाडगे, नंदिनी भामरे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल



मार्गदर्शन केले.प्रा.डॉ.राजकुमार गित्ते यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले .

# सकाळ बुधवार, १८ मार्च २०२६

## डीकेएएससीच्या विद्यार्थ्यांची जे. पी. पारसिक बँकेला भेट

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. येथील जे. पी. पारसिक सहकारी बँकेला विद्यार्थ्यांनी भेट देऊन बँकेच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना बँकेची रचना, ठेवी, कर्ज व्यवहार, डिजिटल बँकिंग सेवा, ग्राहक सेवा तसेच सहकारी बँकांचे स्थानिक अर्थव्यवस्थेतील महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून बँकिंग व्यवस्थेबाबत माहिती जाणून घेतली. प्राचार्य डॉ एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. एच. बोगुलवार, डॉ.वर्षा शिंदे प्रा. एस. एस. पाटील, प्रा. बाजीराव वारंग आदींनी नियोजन केले.